(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

***Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik***

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक
**Meeting of the Board of Management**

## कार्यवृत्त
**Mminutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 189
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open,University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : शुक्रवार , दिनांक 3 नोव्हेंबर 2023
**(Day and Date )** : Friday, 3rd November 2023

**वेळ** (Time) : दुपारी 1.30 वाजता (1.30 pm)

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC 13571
दि. 4 / 11 / 2023

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.189 शुक्रवार दिनांक 03 नोव्हेंबर 2023 रोजी दुपारी 1.30 वाजता विद्यापीठ मुख्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

01.प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू — अध्यक्ष
02. डॉ. प्रकाश बच्छाव - मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी — सदस्य
03. डॉ. गोरक्ष गर्जे - संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी — सदस्य
04. मा. डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे — सदस्य
05. मा. डॉ.संजय चोरडिया, पुणे (Online) — सदस्य
06. मा.डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — सदस्य
07. मा. श्री. भटूप्रसादपाटील, कुलसचिव — सचिव
08. डॉ. गोविंदकतलाकुटे, वित्त अधिकारी — निमंत्रित सदस्य

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

09. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई — सदस्य
10. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
11. सचिव, कृषी विभाग, मुंबई — सदस्य
12. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई — सदस्य
13. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली — सदस्य
14. प्रा.डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — सदस्य
15. आमदार श्री. सुहास कांदे, नाशिक — सदस्य
16. आमदार श्रीमती सरोज आहिरे,नाशिक — सदस्य
17. श्री.उदित सेठ, मुंबई — सदस्य

| अनु.क्रमांक Subject No. | | तपशील Details | सहपत्र Annexture |
|---|---|---|---|
| 189.1 | | स्वागत — मा. अध्यक्ष तथा कुलगुरू यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. | |
| 189.2 | 189.2.1 | दिनांक 20 जून 2023 रोजी झालेल्या 188 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 20 जून 2023 रोजी झालेल्या 188 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. | सहपत्र A |
| | 189.2.2 | **दिनांक 20 जून 2023 रोजी झालेल्या 188 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 20 जून 2023 रोजी झालेल्या 188 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली. | सहपत्र B |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **सखोल चर्चेचे विषय** | |
| 189.3 | 189.3.1<br>वित्त विभाग | **वित्त समितीमध्ये दोन सदस्यांच्या नामनिर्देशनाबाबत.....**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या परिनियम क्रमांक 1 (1 of 1991) कलम 3 मधील (iv) अन्वये Two members nominated by the Board of Management who shall be experts either in Industry or in autonomous institution or in University or in Government,; यातून दोन सदस्यांची नियुक्ती व्यवस्थापन मंडळाकडून करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठाच्या परिनियम क्रमांक 1 (1 of 1991) कलम 3 मधील (iv) अन्वये वित्त समितीत दोन सदस्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.** | सहपत्र C |
| | 189.3.2<br>वित्त विभाग | **दि. 13 जुलै 2023 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर....**<br>**टिपणी** - दि. 13 जुलै 2023 रोजी झालेल्या वित्त समिती 7/2023-24 चे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्त समितीच्या दि. 13 जुलै 2023 रोजी झालेल्या सातव्या बैठकीतील ठराव क्र. 1 ते 10 या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र D |
| | 189.3.3<br>वित विभाग | **दि. 30 ऑक्टोबर 2023 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर....**<br>**टिपणी** - दि. 30 ऑक्टोबर 2023 रोजी झालेल्या वित्त समिती 8/2023-24 चे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्त समितीच्या दि. 30 ऑक्टोबर 2023 रोजी झालेल्या आठव्या बैठकीतील ठराव क्र. 1ते 16, कार्योत्तर मान्यतेचा ठराव- 1 ते 4, ऐनवेळच्या विषयांचे ठराव- 1ते 20 या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र E |
| | 189.3.4<br>ग्रंथनिर्मिती केंद्र | **दि. 23.9.2023 रोजी झालेल्या खरेदी समिती ठराव क्र. पीसी-4/2023-24/06 बाबत...**<br>**टिपणी** – मे. सॅप प्रिंट सोल्याशन्स, मुंबई यांनी प्रलंबित देयकांच्या मागणीतून नागपूर विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रांना अध्ययन साहित्य पुरवठा न केल्याबाबत नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार रु. 2,78,390/- एवढी रक्कम त्यांना देय असलेल्या एकूण रु. 7,37,215/- यातून वजा करून उर्वरित रु. 4,58,825/- एवढे अदा करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. याबाबतचा विषय अंतिम मान्यतेसाठी व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –मे. सॅप प्रिंट सोल्युशन्स यांच्या देय असलेल्या एकूण रु. 7,37,215/- यातून रु. 2,78,390/- वजा करून उर्वरित रक्कम रु. 4,58,825/- एवढे अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र F |
| | 189.3.5<br>वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा | **शैक्षणिक वर्ष 2023-24 एम.बी.ए.शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया करणेकरिता मदत केलेल्या अभ्यासकेंद्रांना देण्यात येणाऱ्या मानधनाबाबत....**<br>**टिपणी** – **AICTE** ने विद्यापीठास सन 2023-24 पासून पुढील 5 वर्ष एम.बी.ए. शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र म्हणून 10000 विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता दिलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थी प्रवेश घेणार असल्याने त्यांना प्रत्येक वेळी विद्यापीठात येणे वेळेच्या मर्यादेमुळे व आर्थिकदृष्या शक्य होणार नाही त्याचा परिणाम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर होईल असे निदर्शनास आले. त्यामुळे मा. कुलगुरू व विभागीय केंद्र संचालकांनी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी मागील वर्षी पर्यंत कार्यरत असणाऱ्या एम.बी.ए. शिक्षणक्रमाच्या काही अभ्यासकेंद्रांना विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास व शिक्षणक्रमांच्या अनुषंगीक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे करिता सूचित केल्याने प्रथम वर्षी 3000 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहे. त्यामुळे एम.बी.ए. शिक्षणक्रमास मदत करणाऱ्या अभ्यासकेंद्रांना विद्यार्थी मदत केंद्र म्हणून मान्यता देण्यास व मदत करणाऱ्या अभ्यासकेंद्रांना प्रति विद्यार्थी रु. 2875/- याप्रमाणे मानधन देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - एम.बी.ए. शिक्षणक्रमास मदत करणाऱ्या अभ्यासकेंद्रांना विद्यार्थी मदत केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली व मदत करणाऱ्या अभ्यासकेंद्रांना प्रति विद्यार्थी रु. 2875/- याप्रमाणे प्रती वर्ष (शैक्षणिक वर्ष 2023-24 करिता) मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र G |

| | | | |
|---|---|---|---|
| | 189.3.6<br>सेवा सुविधा कक्ष | **विद्यापीठात ठेकेदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या अतिकालिन वेतनाबाबत....**<br>**टिपणी** – विद्यापीठाने ठेकेदारामार्फत नेमलेल्या अत्यावश्यक सेवेतील दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना दि. 24 एप्रिल 1999 व दि. 3 सप्टेंबर 2021 यांचा आधार घेऊन अतिकालीन वेतन एकूण वेतनाच्या 50% दिले जात आहे.<br>उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदी खालीलप्रमाणे<br>1. कोणत्याही कर्मचाऱ्यास एका आठवड्यामध्ये 48 तासापेक्षा अधिक कालावधीसाठी एखाद्या आस्थापनेमध्ये काम करण्यास भाग पाडता येणार नाही किंवा मुभा देण्यात येणार नाही अशी तरतूद आहे.<br>2. जर एखादा कर्मचारी रोजंदारी तत्वावर काम करीत असेल तर, त्याच्या विश्रांतीच्या कालांतरासह अशा कर्मचाऱ्याचा कालावधी प्रत्येक दिवशी 10.5 पेक्षा अधिक कालावधी वाढविता येणार नाही.<br>3. जर कर्मचारी, एखाद्या आस्थापनेमध्ये आठवड्यातील सहा दिवस काम करीत असेल तर, त्याच्या विश्रांतीच्या कालांतरासह अशा कर्मचाऱ्यांचा कामाचा कालावधी, प्रत्येक दिवशी साडेदहा तासापेंक्षा अधिक कालावधी वाढविता येणार नाही. उक्त आठवड्यातील सातव्या दिवशी कर्मचाऱ्यास भर पगारी सुट्टी देण्यात येईल.<br>4. जर कर्मचारी कामाच्या तासांमधील लवचिकतेचा तरतुदीमुळे एखाद्या आठवड्यामध्ये सहा दिवसांपेक्षा कमी दिवस आस्थापनेमध्ये काम करीत असेल तर, त्याच्या विश्रांतीच्या कालांतरासह अशा कर्मचाऱ्याचा कामाचा कालावधी, प्रत्येक दिवशी बारा तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी वाढविण्यात येणार नाही आणि उक्त आठवड्याच्या उर्वरित दिवशी, कर्मचाऱ्यास भर पगारी सुट्टी देण्यात येईल.<br>परंतु, कामाच्या तासांमधील लवचिकतेस, वाटाघाटी करणाऱ्या संघटनेच्या किंवा वाटाघाटी करणाऱ्या परिषदेच्या संमतीने अथवा वाटाघाटी करणाऱ्या संघटनेच्या किंवा वाटाघाटी करणाऱ्या परिषदेच्या अभावी, कर्मचाऱ्यांनी बहुमताने दिलेल्या संमतीने परवानगी देण्यात येईल.<br>5. कोणत्याही कर्मचाऱ्यास, पाच तास काम केल्यानंतर अर्धा तास विश्रांती दिल्याशिवाय सलगपणे पाच तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी काम करण्याची मुभा देता येणार नाही.<br>मात्र बांधकाम कक्ष व मा. कुलगुरू कार्यालय या दोन विभागाच्या विभाग प्रमुखांनी त्याच्या विभागातील कामाचा भार लक्षात घेऊन विभागांतर्गतअंतर्गत काम करणाऱ्या दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांची वेतनाच्या 50% ची अट शिथील करणेची अट शिथील करण्याची शिफारस केली आहे. याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठात ठेकेदारामार्फत - बांधकाम कक्ष, मा. कुलगुरू कार्यालय, सेवा सुविधा कक्ष या कक्षांतर्गत अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिकालीन वेतनाची 50% अट शिथील करून एकूण वेतनाच्या 75% इतके अतिकालिन वेतन अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र H |
| | 189.3.7<br>आस्थापना<br>कक्ष | **टिपणी – विद्यापीठातील 68 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील वयोधिक्य, नियुक्तीची कार्यपद्धती तसेच शैक्षणिक पात्रता याबाबींमध्ये असलेल्या अनियमिततेचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर....**<br>विद्यापीठातील 68 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील वयोधिक्य, नियुक्तीची कार्यपद्धती तसेच शैक्षणिक पात्रता या बाबींमध्ये अनियमितता दर्शविलेल्या प्रकरणांसंदर्भात दि.13 ऑगस्ट 2019 च्या शासनाच्या पत्रान्वये सदर अनियमितता शिथील करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळास देण्यात आलेले आहेत<br>याकरिता मा. व्यवस्थापन मंडळाने डॉ. अनिल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. समितीने दरवर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याच प्रकरणांसंदर्भात | सहपत्र I |

शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे निर्देश दिल्याने 68 प्रकरणांपैकी 27 प्रकरणांशी संबंधित शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळापुढे सादर केल्याने व्यवस्थापन मंडळाने सदर 27 प्रकरणांसंदर्भातील शिफारशी मान्य केलेल्या असून सदर 27 प्रकरणांचा निपटारा झालेला आहे.

मा. सहसंचालक कार्यालयाने सर्वच प्रकरणांचा निपटारा करून त्याचा अहवाल सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्यामुळे उर्वरित 41 प्रकरणांसंदर्भात समितीने शिफारशी करून त्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्यासाठी दि.26.09.2023 रोजी समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत 5 प्रकरणांच्या संदर्भात केलेल्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत असून त्या खालील तक्त्यात दर्शविलेल्या आहेत.

| अ.क्र. | नाव | पद | आक्षेप | शिफारशी |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रमोद रंगनाथ जावळे | नेटवर्क इंजि. | नियुक्ती कार्यपध्दती | वरिष्ठ सहायक या पदोन्नतीच्या संवर्गातून डाटा प्रोसेसिंग सुपरवायझरची 4 पदे निर्माण केलेली आहेत. सदर पदे सरळसेवेने भरण्याऐवजी ती अनुभवी सहायकांमधून पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. यापुढे रिक्त झालेली पदे सरळसेवेतून भरण्यात येतील. या स्पष्टीकरणाआधारे श्री. प्रमोद जावळे, श्री. मिलींद हिंगणे व श्री. प्रेमनाथ सोनवणे यांची नेमणूक कार्यपद्धती मान्य करून त्रुटी वगळण्याची शिफारस करण्यात आली. |
| 2 | श्री. मिलिंद नारायण हिंगणे | डाटा प्रोसेसिंग सुपरवायझर | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 3 | श्री. प्रेमनाथ सोनवणे | डाटा प्रोसेसिंग सुपरवायझर | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 4 | डॉ. कैलास भटा बोरसे | उपकुलसचिव | शैक्षणिक पात्रता | नियुक्ती वर्षातच मराठी लघुलेखन 120 श.प्र.मि. पात्रतेची प्रमाण सादर केले नाही अशी त्रुटी होती. परंतु श्री. बोरसे यांनी नियुक्तीनंतर लगेचच मे 1991 मध्ये मराठी लघुलेखनात 120 चा स्पीड प्राप्त केलेला असल्याने त्याबाबत अधिकृत सदर प्रमाणपत्र सादर केलेले असून लघुलेखक (उच्च श्रेणी) साठी आवश्यक 120 स्पीड दिसून येत आहे. त्यामुळे याबाबत काढलेली त्रुटी लागू होत नाही. तसेच त्यांची सहायक कुलसचिव पदावरील नियुक्ती व उपकुलसचिव पदावरील पदोन्नती विहित प्रक्रियेतून झालेल्या असल्याने त्या माफ करून श्री. बोरसे यांच्या संदर्भातील त्रुटी वगळण्याची व त्यांच्या निवृत्तीवेतन प्रकरणाची शिफारस करण्यात येत आहे. |
| 5 | श्रीमती गायत्री सुनील हिंगणे | सहायक | वयोधिक्य | जाहिरातीच्या वेळी खुल्या प्रवर्गासाठीशासन निर्णयानुसार कमाल वयोमर्यादा 28 वर्षे होती. श्रीमती हिंगणे ह्या जाहिरातीच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादेत होत्या. सदर स्पष्टीकरण विचारात घेतल्यास श्रीमती हिंगणे ह्या जाहिरातीच्या दिनांकास वयोमर्यादेत असल्याने त्यांच्या वयोधिक्याची त्रुटी वगळण्याची शिफारस करण्यात येत आहे. |

**उर्वरित खालील प्रकरणांसंदर्भात मा. व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी हे बैठकीत चर्चा करणार आहेत.**

| अ.क्र. | नाव | पद | त्रुटी | शिफारस |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अभय मनोहर कुलकर्णी | तांत्रिक सहायक | शैक्ष. पात्रता व अनुभव | श्री. अभय कुलकर्णी यांच्याकडे डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन ही पात्रता असून व्हिडिओ एडिटिंग कामाचा अनुभव होता. |
| 2 | श्री. राजेंद्र भागवत तळेले | नेटवर्क इंजि. | नियुक्ती कार्यपध्दती | व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्र.ए-100/2002/14 अन्वये श्री. तळेले यांची नेटवर्क इंजीनिअर पदावर 2 वर्षांच्या परीविक्षावधीन कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली. |
| 3 | श्री. राजाराम पांडुरंग बचाटे | क. तांत्रिक सहायक | वयोधिक्य | मा. प्रधानसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविलेल्या पत्रात कनिष्ठ तांत्रिक सहायक पदी श्री. बचाटे यांची नेमणूक करणेबाबत पाठविलेल्या पत्रास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | श्री. अविनाश उमाकांत भरणे | ग्राफिक आर्टिस्ट | नियुक्ती कार्यपध्दती | जाहिरातीत A Bachlors Degree/ Diploma in fine Arts / Graphic Design/ Animation / Commercial art + 3 Years experience in preparation of Graphic visual materials animated caption Computer Animation and modes for TV chanels or an advt. agency मधील अनुभव मागितला होता.<br>यानुसार श्री. भरणे यांच्याकडे बॅचलर ऑफ फाईन आर्टस ची पदवी असून मल्टिमिडिया कंपनीतील इलस्ट्रेटर चा अनुभव आहे. | | |
| | 5 | श्री. प्रदीपकुमार दामोदर पवार | सॉफ्टवेअर इंजि. | वयोधिक्य | जाहिरातीत या पदाकरिता 5 वर्षाचा अनुभव व 35 वर्षे वयोमर्यादा दर्शविण्यात आली होती. नियुक्तीच्या वेळी त्यांचे वय 33 वर्षे 8 महिने असल्याने ते वयोमर्यादेत होते. दि.20 जून 2023 च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ए-100/03/285 अन्वये श्री. प्रदीपकुमार पवार यांच्या नियुक्तीच्या शिफारसीला मान्यता देण्यात आली. | | |
| | 6 | श्री. विलास नथू बेडसे | सहायक | वयोधिक्य | सदर कर्मचारी दैनंदिन वेतनावर तसेच करारावरील सेवेत होते. दि.10.01.2005 रोजी पदे नियुक्त शिफारस समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तत्कालिन कुलगुरू यांच्या निर्देशानुसार या कर्मचाऱ्यांची करारावरील सेवा विचारात घेऊन त्यांना विद्यापीठ सेवेत नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर नियुक्ती ही विना जाहिरात असली तरी पदे नियुक्ती शिफारस समितीच्या अहवालास व्यवस्थापन मंडळाच्या दि. 5 नोव्हेंबर 2004 च्या बैठकीतील ठराव क्र. ए-100/04/128 अन्वये मान्यता देण्यात आल्याने सदर नियुक्ती व्यवस्थापन मंडळाने मान्य केली आहे. | | |
| | 7 | श्री. तुकाराम मुकुंदा पाटील | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | | | |
| | 8 | श्री. बाळू कारभारी साबळे | सहायक | नियुक्ती कार्यपद्धती | | | |
| | 9 | श्री. युवराज काबू पगारे | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | | | |
| | 10 | श्री. गुलाब रामदास अहिरे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | | | |
| | 11 | श्री. भगवंत अनंत चुंबळे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, | | | |
| | 12 | श्री. राजेश सिताराम बर्वे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, | | | |
| | 13 | श्री. राजू मल्हारी जगताप | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, | | | |
| | 14 | श्री. राजेंद्र वासुदेव मांडगे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | | | |
| | 15 | श्रीमती हेमलता वसंत निकम | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | | | |
| | 16 | श्रीमती लीना आंबादास साळुंके | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | | | |
| | 17 | श्री. हेमंत [illegible] | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | | | |
| | 18 | श्री. सुदाम कडुबा गोराडे | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 19 | श्री. बाजीराव गंगाधर पवार | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 20 | श्री. मनोहर निंबाजी सैंदाणे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 21 | श्री. महेश सोनू बल्लाळ | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 22 | श्री. अनंत शंकर जोशी | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 23 | श्री. शरद दयाराम पाटील | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 24 | श्री. केशव मोतीलाल बुऱ्हाडे | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 25 | श्री. विजयसिंह बबनसिंह रजपूत | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 26 | श्री. राजू नाना कटारे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 27 | श्री. मनोहर गुलाबराव पाटील | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 28 | श्री. दत्तात्रय रघुनाथ फालक | शिपाई | वयोधिक्य | |
| 29 | श्री कैलास पंढरीनाथ सुर्यवंशी | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती, वयोधिक्य | |
| 30 | श्री. अनिल बाळकृष्ण निपळुंगे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 31 | श्री. जितेंद्र बन्सीलाल बोरसे | सहायक | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 32 | श्री. रविंद्र शिवराम मोरे | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 33 | श्री. पोपट महादेव गोतरणे | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 34 | श्रीमती मनिषा राजू जाधव | शिपाई | नियुक्ती कार्यपध्दती | |
| 35 | श्री. संतोष शिवाजी साबळे | फ्लोअर मॅनेजर | नियुक्तीची कार्यपध्दती | श्री. साबळे यांच्याकडे 25.05.2007 या नियुक्तीच्या दिनांकास जाहिरातीनुसार शैक्षणिक पात्रता नसून फ्लोअर मॅनेजर पदाचा अनुभव आहे. |
| 36 | श्री. सचिन दगू कटारे | कॅमेरामन | नियुक्तीची कार्यपध्दती | श्री. कटारे यांच्याकडे जाहिरातीत दर्शविलेली पात्रता दिसून येते. |

कृपया उपरोक्त 05 प्रकरणांसंदर्भात समितीने केलेल्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहेत. तसेच उर्वरित 36 प्रकरणांतील काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्याने

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यांची सेवानिवृत्तीवेतन प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे मा. सहसंचालक, पुणे कार्यालयाने सर्वच प्रलंबित प्रकरणांचा अहवाल सादर करणेबाबत दिलेले आदेश विचारात घेऊन 36 प्रकरणांसंदर्भात निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – 41 पैकी पहिल्या तक्त्यात नमूद केलेले 1) श्री. प्रमोद रंगनाथ जावळे 2) श्री. मिलिंद नारायण हिंगणे 3) श्री. प्रेमनाथ सोनवणे 4) डॉ. कैलास भटा बोरसे 5) श्रीम. गायत्री सुनिल हिंगणे या 05 प्रकरणांच्या संदर्भात समितीने केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. उर्वरित 36 प्रकरणांवर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन त्यासंदर्भातील शिफारशी टप्प्याटप्याने व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.** | |
| | 189.3.8<br>**अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र** | **शैक्षणिक सेवा विभाग विद्याशाखेत रूपांतरित करणे आणि रुपांतरित करण्यात आलेल्या विद्याशाखेचे नामकरण** School of Multidisciplinary Studies **करणेबाबत..**<br>टिपणी – विद्यापीठ अनुदान आयोगाच्या **ODL Regulation** 2020 आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शैक्षणिक सेवा विभागामार्फत असलेले सर्व शैक्षणिक कार्य प्रत्येक विद्याशाखेने स्वतंत्रपणे करणे अपेक्षित आहे, असे केल्यास वेळेत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सेवा उपलब्ध करणे शक्य होणार आहे. त्यामुळे शैक्षणिक सेवा विभागाचे आता पूर्वीसारखे कार्य शिल्लक राहिले नसल्याने शैक्षणिक सेवा विभाग बंद करून त्याऐवजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सर्व समावेशक शिक्षण देणाऱ्या विद्याशाखेची निर्मिती करण्यात यावी यासाठी प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाकडे विचारार्थ व मान्यतेसाठी सादर...<br>प्रस्ताव – 1. शैक्षणिक सेवा विभाग बंद करून विभागाचे रुपांतरण विद्याशाखेत करणे आणि रूपांतरित विद्याशाखेचे नामकरण School of Multidisciplinary Studies असे करण्यास मान्यता मिळणे.<br><br>2. शैक्षणिक सेवा विभागासाठी मान्य असलेले शिक्षक संवर्गातील पदे अबाधित ठेवून नव्याने स्थापन करण्यात येते असलेल्या School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेकडे वर्ग करणे आणि विद्याशाखेच्या निकडीनुसार शिक्षणसंवर्गातील पदांच्या शैक्षणिक पात्रतेत बदल करण्याचे आणि भरती प्रक्रिया करण्याचे अधिकार माननीय कुलगुरू यांना देणे बाबत.<br><br>3. नव्याने निर्माण होणाऱ्या School of Multidisciplinary Studies च्या संचालकपदी नेमणूक करण्याचे अधिकार माननीय कुलगुरू यांना देणेबाबत.<br><br>4. प्रचलित विहित पध्दतीचा अवलंब करून विविध विषयांतील प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी इत्यादी, शिक्षणक्रम विकसित करणे आणि ते Online/Offline पद्धतीने राबविण्यास मान्यता देणे.<br><br>5. School of Multidisciplinary Studies अस्तित्वात आल्यानंतर आणि त्या विद्याशाखा संचालकपदाची नेमणूक करण्यात आल्यानंतर नवनियुक्त संचालकांनी विद्याशाखेच्या Mission, Vision, Objectives, विद्याशाखेचा पंचवार्षिक कार्यक्रम इत्यादींबाबत विस्तृत अहवाल पुढील व्यवस्थापन मंडळाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.<br><br>6. School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेच्या सर्वांगीण विकासासाठी वेळोवेळी निर्णय घेण्यासाठी विद्याशाखा परिषद गठित करणे व त्यातील सदस्यांचे नामांकन करण्याचे सर्व अधिकार माननीय कुलगुरू यांना देण्यात यावे.<br><br>वरील 1 ते 6 मुद्यांसह इतर निर्णय घेण्याचे सर्वाधिकार माननीय कुलगुरूंना देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - शैक्षणिक सेवा विभाग विद्याशाखेत रूपांतरित करणे आणि रुपांतरित करण्यात आलेल्या विद्याशाखेचे नामकरण School of Multidisciplinary Studies करण्यास व त्याबाबतच्या प्रस्तावित 1 ते 6 मुद्यांबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरूंना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र J |

| | | | |
|---|---|---|---|
| | 189.3.9 अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **आरोग्य विज्ञान विद्याशाखेतंर्गत** Centre for Indian Knowledge System **स्थापन करणेबाबत..**<br>**टिपणी** - भारतातील हजारो वर्षात विकसित झालेल्या विविध ज्ञानप्रणालीचा शोध घेऊन त्याचे जतन व प्रसार हे या केंद्राचे मुख्य कार्य राहील. त्यातून भारताच्या सखोल ज्ञान, सुविधा संशोधनाचे जगाला कळावे व त्याला भारताच्या ज्ञानाला अजून चालना देण्यकरिता Centre for Indian Knowledge System याची आरोग्य विज्ञान विद्याशाखेतंर्गत सुरू करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – School of Multidisciplinary Studies च्या अंतर्गत** Centre for Indian Knowledge System **हे केंद्र स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र K |
| | 189.3.10 आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या विविध विभाग / केंद्र / कक्ष व विद्याशाखा येथे करारावरील नियुक्तीबाबतचा विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर।..**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या विविध विभाग / केंद्र / कक्ष व विद्याशाखा यांच्या मागणीनुसार येथे करारावरील Emeritus Professor, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, सल्लागार, सहयोगी सल्लागार, संयोजक (शैक्षणिक), संयोजक (प्रशासकीय), जनसंपर्क अधिकारी, विशेष कार्याधिकारी, व विद्यापीठातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्त्या विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) व विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार केल्या जातात.<br>1. **विद्यापीठ परिनियम क्र.** 11 (2 of 1993) **अन्वये The period of contract shall, at a time, be of not less than six months and not more than two years, extendible upto one more year with the prior approval of the Board of Management** यानुसार सहा - सहा महिन्याच्या कालावधीसाठी मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत करारावर विद्यापीठाच्या विविध विद्याशाखा, कक्ष व विभागीय केंद्र येथे नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. (सोबत परिनियमाची प्रत जोडलेली आहे.)<br>2. **विद्यापीठ कायदा क्र. 20 (9 सी) अन्वये to make short term appointments for a period not exceeding six months at a time, but which may further be extended for a period not exceeding one year in the aggregate, of such persons as may be considered necessary for the functioning of the University.** यानुसार मा. कुलगुरूंना कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत नियुक्त्यांचे अधिकार आहेत. (सोबत कायद्याची प्रत जोडलेली आहे.)<br>मा. कुलगुरू यांनी विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) व विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार त्यांच्या अधिकारात केलेल्या करारावरील नियुक्त्यांची यादी जोडलेली आहे. सदर नियुक्त्या ह्या विविध विभागाच्या कामाच्या आवश्यकतेनुसार व NEP च्या धोरणानुसार कामकाज वाढल्याने सदर नियुक्त्या करारावर करण्यात आलेल्या आहेत. सदर करारावरील नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) व विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार मा. कुलगुरू यांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या करारावरील नियुक्त्यांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र L |

189.3.11 आस्थापना कक्ष

**विद्यापीठाच्या विभागीय केंद्र, पुणे येथिल सहयोगी सल्लागार (प्रशासकीय), श्री. उत्तम सावळेराम जाधव यांच्या करारावरील नियुक्तीबाबतचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर.**

सहपत्र M

( **टिपणी** - विद्यापीठाच्या विविध विभाग / केंद्र / कक्ष, विद्याशाखा व विभागीय केंद्र येथे तेथिल विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार करारावरील नियुक्त्या विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अंतर्गत तरतुदीनुसार केल्या जातात.विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये सहा - सहा महिन्याच्या कालावधीसाठी मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत करारावर नियुक्ती देता येऊ शकते. त्यानुसार श्री. उत्तम सावळेराम जाधव, सहयोगी सल्लागार (प्रशासकीय), विभागीय केंद्र, पुणे यांची मा. कुलगुरूंच्या अधिकारातील दोन वर्षाच्या नियुक्त्यांची मुदत दि. 19.09.2023 रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर परिनियमातील मुद्दा क्र. 5.4 नुसार त्यांना पुढील एक वर्ष नियुक्त्यांसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या अधिकारात नियुक्ती देता येऊ शकते. मा. कुलगुरूंनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने त्यांच्या पुढील नियुक्तीस मान्यता दिलेली आहे. सदर बाब कार्योत्तर मान्यतेसाठी व्यवस्थापन मंडळापुढे सादर. (सोबत परिनियमाची प्रत जोडलेली आहे.)

| क्र | नाव व पद | नेमणुकीचा कालावधी | वर्षे | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. उत्तम सावळेराम जाधव | दि. 17.09.2020 ते दि. 16.03.2021 | 6 महिने | रू. 40000/- |
| | सहयोगी सल्लागार | दि. 17.03.2021 ते दि. 16.09.2021 | 6 महिने | रू. 40000/- |
| | (प्रशासकीय) | **एकूण कालावधी 20 (9 C) नुसार** | **1 वर्ष** | |
| | विभागीय केंद्र, पुणे | दि. 17.09.2021 ते दि.16.03.2022 | 6 महिने | रू. 40000/- |
| | | दि. 17.03.2022 ते दि.16.09.2022 | 6 महिने | रू. 40000/- |
| | | दि. 19.09.2022 ते दि.18.03.2023 | 6 महिने | रू. 45000/- |
| | | दि. 20.03.2023 ते दि.19.09.2023 | 6 महिने | रू. 45000/- |
| | | दि. 20.09.2023 ते दि. 19.03.2024 | 6 महिने | रू. 45000/- |
| | | **एकूण कालावधी 11 (2 of 1993) नुसार** | **2.6 वर्षे** | |

विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) अन्वये मा. कुलगुरू यांनी विद्यापीठाच्या विभागीय केंद्र, पुणे येथिल सहयोगी सल्लागार (प्रशासकीय), श्री. उत्तम सावळेराम जाधव यांच्या व्यवस्थापन मंडळाच्या अखत्यारीतील 1 वर्षासाठी करावयाच्या नियुक्तीची शिफारस व्यवस्थापन मंडळ सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठाच्या विभागीय केंद्र, पुणे येथिल सहयोगी सल्लागार प्रशासकीय), श्री. उत्तम सावळेराम जाधव यांच्या नियुक्तीस १९ मार्च २०२४ पर्यंत व वयाच्या ६२ वर्षापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेऊन सदर नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

189.3.12 आस्थापना कक्ष

**विद्यापीठातील नियमित शिक्षकांच्या कॅससाठीच्या API Form बाबत...**

सहपत्र N

**टिपणी** – आपल्या विद्यापीठातील शिक्षकांसाठी सातव्या वेतन आयोगानुसार करियर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी ते प्राध्यापक पदोन्नतीपर्यंतचे लाभ देण्यासाठी त्या त्या Appex Body चे निकष व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांचा विचार करून सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार API Forms मध्ये मा. कुलगुरूंच्या मान्यतेने गठित केलेल्या समितीने काही बदल करून तयार केले होते. त्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 20 जून 2023 च्या बैठकीतील ठराव क्र. 188.3.3 अन्वये मान्यता घेऊन मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडे मान्यतेस्तव पाठविण्यात आला होता. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सदर बदलास मान्यता देता येणार नाही यापुढे विद्यापीठ अनुदान आयोगाचा (UGC) API form स्विकारावा व त्यानुसार कॅसचे लाभ लागू करणेसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर..

**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठातील नियमित शिक्षकांना सर्वस्तरावरील वरिष्ठ वेतनश्रेणी ते प्राधापक पदोन्नतीपर्यंतचे लाभ देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) API form स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** | | | |
|---|---|---|---|
| 189.4 | 189.4.1 | **प्र-कुलगुरू पदाच्या नियुक्तीच्या शिफारशीबाबत...**<br>**टिपणी – 1.** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायद्यात 12 जुलै 2006 पर्यंत झालेल्या बदलानुसार कायद्यातील कलम 10A नुसार मा. कुलगुरू यांना विद्यापीठातील विद्याशाखा संचालकांमधून प्र-कुलगुरू पदावर नियुक्तीची शिफारस व्यवस्थापन मंडळाला करण्याची तरतुद आहे.<br>उपरोक्त संदर्भाधिन 11 जाने. 2023 च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रान्वये या विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 10A मध्ये झालेल्या बदलान्वये मा. कुलगुरू यांना विशेषाधिकारांतर्गत प्र- कुलगुरू पदाच्या नियुक्तीसाठी मा. व्यवस्थापन मंडळापुढे प्र-कुलगुरू पदावर नियुक्तीसाठी शिफारस करण्याची तरतूद आहे. मा. कुलगुरू यांनी केलेल्या सदर शिफारशीनुसार व्यवस्थापन मंडळाला या विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदी नियुक्ती करता येते.<br>2. यानुसार मा. कुलगुरू हे या विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदाच्या नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या परिचय पत्र (Bio-data) नुसार डॉ. जोगेंद्रसिंह मोतीसिंह बिसेन यांची शिफारस करीत आहेत. सोबत अवलोकनार्थ त्यांचे परिचय पत्र (Bio-data) जोडले आहे.<br>कृपया उपरोक्त कायद्यातील तरतुदीनुसार मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन मंडळास केलेल्या शिफारशीन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदी डॉ. जोगेंद्रसिंह मोतीसिंह बिसेन यांच्या नियुक्तीस मान्यता मिळावी याकरीता सदर विषय व्यवस्थापन मंडळापुढे सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – 11 जाने. 2023 च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रान्वये विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 10A च्या तरतूदीनुसार मा. कुलगुरू यांनी डॉ. जोगेंद्रसिंह मोतीसिंह बिसेन यांच्या प्र-कुलगुरू पदावर केलेल्या नावाच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र O |
| | 189.4.2<br>दृकश्राव्य केंद्र | **मुख्यालयाव्यतिरिक्त पुणे, छ.संभाजी नगर, नागपूर आणि मुंबई या ठिकाणी स्टुडियो स्थापन करणेबाबत...**<br>**टिपणी – NEP2020** च्या मार्गदर्शक तत्वानुसार शिक्षणक्रमांच्या वाढलेल्या कार्यक्रमांची पूर्तता करणे विद्यापीठातल्या सध्याच्या उपकरण संचाच्या सहाय्याने होणे अवघड असल्याने विद्यापीठ मुख्यालयाव्यतिरिक्त पुणे, छ.संभाजी नगर, नागपूर आणि मुंबई येथे विद्यापीठाचे व्हिडियो स्टुडियो स्थापन करणेबाबत दृक-श्राव्य केंद्र सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. विद्यापीठ मुख्यालयाव्यतिरिक्त इतर ठिकाणी स्टुडियो स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – मुख्यालयाव्यतिरिक्त पुणे, छ.संभाजी नगर, नागपूर आणि मुंबई येथे स्टुडियो स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र P |
| | 189.4.3<br>बांधकाम विभाग | **विद्यापीठासाठी मौजे घोरवड, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील घोरवड ग्रामपंचायत हद्दीमधील गट क्र. 14 व गट क्र. 15 मधील 40 हेक्टर जागा शासनामार्फत संपादन करणेकामी प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत....**<br>**टिपणी** - विद्यापीठासाठी मौजे घोरवड, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील घोरवड ग्रामपंचायत हद्दीमधील गट क्र. 14 व गट क्र. 15 मधील 40 हेक्टर जागा शासनामार्फत संपादन करणेकामी प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठासाठी मौजे घोरवड, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील घोरवड ग्रामपंचायत हद्दीमधील गट क्र. 14 व गट क्र. 15 मधील 40 हेक्टर जागा शासनामार्फत संपादन करणेकामी प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र Q |

| | | | |
|---|---|---|---|
| | **189.4.4 बांधकाम विभाग** | **विद्यापीठाच्या बांधकाम समितीवर व्यवस्थापन मंडळा मधून दोन सदस्यांची बांधकाम समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेबाबत...**<br>**टिपणी** – बांधकाम समिती अध्यादेश क्र .14 (3 of 1993) मधील कलम 3.1 (iii) च्या तरतुदीनुसार Two members from the Board of Management of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University to be nominated by Board of Management नेमण्याची तरतूद आहे. यानुसार बांधकाम समितीवर व्यवस्थापन मंडळातील खालील दोन प्रस्तावित सदस्यांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्येतेस्तव सादर....<br>1. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण विभाग, मुंबईकिंवा त्यांचे प्रतिनिधी<br>2. मा. संचालक, तंत्रशिक्षण विभाग, मुंबईकिंवा त्यांचे प्रतिनिधी<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठाच्या बांधकाम समितीवर व्यवस्थापन मंडळातून मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण विभाग, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि मा. संचालक, तंत्रशिक्षण विभाग, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र R |
| | **189.4.5 अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र** | **शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी** Annual Quality Assurance Report 2022-23 **आणि** CIQA Annual Report 2022-23 **सादर....**<br>**टिपणी** - शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी Annual Quality Assurance Report 2022-23 आणि CIQA Annual Report 2022-23 व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी Annual Quality Assurance Report 2022-23 आणि CIQA Annual Report 2022-23 ला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | सहपत्र S |
| | **189.4.6** आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजीकशास्त्रे विद्याशाखा, येथील सहयोगी सल्लागार (शैक्षणिक)उर्दु, डॉ. रशीद अशरफ खान यांच्या करारावरील नियुक्तीबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर. . .**<br>**टिपणी** - विद्यापीटाच्या विविध विभाग / केंद्र / कक्ष, विद्याशाखा व विभागीय केंद्र येथे तेथिल विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार करारावरील नियुक्त्या विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अंतर्गत तरतुदीनुसार केल्या जातात. विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये सहा - सहा महिन्याच्या कालावधीसाठी मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत करारावर नियुक्ती देता येऊ शकते. त्यानुसार डॉ. रशीद अशरफ खान, सहयोगी सल्लागार (शैक्षणिक) - उर्दु, मानव्यविद्या व सामाजीकशास्त्रे विद्याशाखा यांची मा. कुलगुरूंच्या अधिकारातील दोन वर्षाच्या नियुक्त्यांची मुदत दि. 03.11.2023 रोजी संपुष्टात येत आहे. सदर परिनियमातील मुद्दा क्र. 5.4 नुसार त्यांना पुढील एक वर्ष नियुक्तीसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या अधिकारात नियुक्ती देता येऊ शकते(सोबत परिनियमाची प्रत जोडलेली आहे.). सदर बाब व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठ परिनियम क्र. 11(2 OF 1993) अन्वये मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, येथील डॉ. रशीद अशरफ खान सहयोगी सल्लागार (शैक्षणिक) – उर्दु यांच्या दोन वर्षाच्या नियुक्तीची मुदत संपल्यानंतर ३.११.२०२३ रोजी संपुष्टात आल्यानंतर याच परिनियमातील मुद्दा क्र. ५.४ नुसार त्यांच्या पुढील एक वर्ष नियुक्तीसाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यादरम्यान जाहीरात देऊन पद भरती झाल्यास यांची नियुक्ती संपुष्टात येईल.** | सहपत्र T |

**189.4.7**
विधी कक्ष

**विद्यापीठाने विविध संस्थांशी केलेल्या सामंजस्य कराराचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर...**

सहपत्र U

**टिपणी** – 31 ऑक्टोबर 2023 रोजी विद्यापीठाने खालील संस्थांशी विविध कारणांसाठी केलेले सामंजस्य करार (**MOU**) व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....

| क्र. | संस्थांचे नाव | कराराचा तपशील |
|---|---|---|
| 1 | आद्यम योग संस्था, पुणे | क्युरेटिव्ह योग शिक्षणक्रम |
| 2 | टिमलिज प्रा. लि., बोरिवली | वाणिज्य शाखेतील पदवी धारकांना शिकाऊ उमेदवारीचा लाभ |
| 3 | व्हॅनिला स्किल्स प्रा. लि., मालाड | सोशल मिडिया मार्केटिंग प्रमाणपत्र शिक्षणक्रम |
| 4 | सुपरमाईंड फाऊंडेशन अॅन्ड बोध, पुणे | स्थानिक भाषेतील संशोधनावर भर देण्यासाठीचे प्रशिक्षण शिक्षणक्रम |
| 5 | द्रोणाचार्य अकॅडमी, बावधन, पुणे | ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण अभ्यासक्रम |
| 6 | विगो फाऊंडेशन, नाशिक | बौधिक स्वामित्व हक्क (पेटंट) विषयी मार्गदर्शन |
| 7 | बहाई अकॅडमी, पाचगणी | मूल्यशिक्षण संदर्भात प्रमाणपत्र शिक्षणक्रम |
| 8 | अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड मॅनेजमेंट, ठाणे | शिकाऊ उमेदवार योजना कायद्यांतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना रोजगार उपलब्ध |
| 9 | भारतीय सैन्य दल | सैन्य दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी बी.ए., बी.कॉम. शिक्षणक्रम |
| 10 | नपाते इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ केअर एज्युकेशन, पुणे | महिलांसाठी आरोग्यसेविका प्रशिक्षण शिक्षणक्रम |
| 11 | स्किल फॅक्टरी लर्निंग प्रा. लि., पुणे | पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी मराठी व इंग्रजी माध्यमातून सायबर सिक्युरिटी शिक्षणक्रम |
| 12 | महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे | ऑनलाईन प्रवेश 2023-24, **LMS**, Affilation Management |

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठाने वरील संस्थांशी विविध कारणांसाठी केलेल्या सामंजस्य (**MOU**) करारांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**